| | |
|---|---|
| MHST080007642023 | **नियमीत दिवाणी दावा क्र.२२३/२०२३ मधील निशाणी क्र.२७ वरील आदेश.**<br>**इंदुबाई दादू घुले व इतर**<br>**–वि.–**<br>**बिरा दादू केसकर व इतर**<br>**(आदेश पारित दिनांक १०.०९.२०२४)** |

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.६ यांनी त्यांचेविरुद्ध झालेला विना कैफियत आदेश रद्द होऊन मिळावा व कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी याकरिता दाखल केला आहे.

**०२.** प्रस्तूत अर्जात प्रतिवादी क्र.६ यांनी असे कथन केले आहे की, त्यांना प्रशासकीय कामकाजामुळे दाव्याचे कामी कैफियत देणेसाठी मुदतीत कागदपत्रांची जमवाजमव करुन वकिलांना भेटून माहिती देणे जमले नाही. त्यामुळे, त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे, त्यांच्याविरुद्ध विना कैफियत दावा चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला. सदर कैफियत देणेस उशिर होण्यामागे प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक कोणतीही चूक केलेली नाही. सदर प्रतिवादी यांची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.६ यांनी त्यांचेविरुद्ध झालेला विना कैफियतचा आदेश रद्द होऊन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेची विनंती केलेली आहे.

**०३.** सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. वादींचे म्हणण्यानुसार, प्रतिवादी यांचा अर्ज खरा व प्रामाणीक नाही. त्यामुळे, त्यांनी सदर अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

**०४.** अर्ज व त्यावरील वादींचे म्हणणे याचे अवलोकन केले. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे व सदर अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद संपुष्टात आणण्याकरिता दोन्ही पक्षांना संधी देणे

सदर दाव्याचा निकाल गुणवत्तेवर देण्याच्या दृष्टीने योग्य वाटते. प्रतिवादी क्र.६ यांची कैफियत अभिलेखावर येण्याने वादींचे काहीही नुकसान होणार नसून प्रस्तुत दाव्याचा गुणावगुणावर निर्णय होण्यास मदतच होणार आहे. याउलट कैफियत अभिलेखावर न घेतल्यास प्रतिवादी क्र.६ यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल व त्यांच्यावर अन्याय होईल, तसेच प्रतिवादी क्र.६ यांना दाव्याचे कामी आपला बचाव मांडता येणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | निशाणी क्र.२७ चा अर्ज रक्कम रुपये ५०/– चे कॉस्ट वर मंजूर करणेत येतो. |
| २. | सदरची कॉस्ट प्रतिवादी क्र.६ यांनी वादींना देण्यात यावी. |
| ३. | प्रतिवादी क्र.६ यांनी कॉस्ट भरलेनंतर त्यांना आपली कैफियत पटलावर दाखल करता येईल. |
| ४. | सदर आदेशाची नोंद दोन्ही पक्षकारांनी घ्यावी. |

PATTEBAHADUR KARUNA

Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2024.09.13 15:59:26 +0530

(के. ए. पट्टेबहादुर)

दिनांकः १०.०९.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, खंडाळा

लघुलेखकाचे नाव – सौ. पौर्णिमा नितीन धामणेरकर

(सौ. पौ. नि. धामणेरकर)

लघुलेखक (ग्रेड – ३)